# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०५ मार्च, २०२० / फाल्गुन १५, १९४१ ( शके )**

(१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री
(२) कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री
(३) ऊर्जा मंत्री
(४) बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री
(५) वने, भूकंप पुनर्वसन मंत्री
(६) आदिवासी विकास मंत्री
(७) सहकार, पणन मंत्री
(८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री

} यांचे प्रभारी विभाग

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४३**

---

### राज्यात महावितरण कंपनीने मे.रोलेक्स आणि मे.फ्लॅश कंपनीमार्फत खरेदी केलेले वीज मिटर सदोष असल्याबाबत

**(१) * १५०८ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरण कंपनीने मे.रोलेक्स आणि मे.फ्लॅश कंपनीकडून खरेदी केलेले सुमारे १० लाख मीटर सदोष असून वीज वापराची नोंद चुकीची दर्शवित असल्याने सुमारे ८ लाख २७ हजार मीटर बदलून भंगारात काढण्यात

आल्याने महावितरण कंपनीस १६० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रकमेची नुकसान भरपाई व्हावी म्हणून विजेचे दर वाढविण्यात येणार असल्याने त्याचा भुर्दंड सामान्य ग्राहकांवर पडणार असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने वीज दरवाढ न करता निकृष्ट दर्जाच्या मीटरचा पुरवठा करणाऱ्या कंपनीवर व मीटरची गुणवत्ता परिक्षण न करता ते खरेदी करणाऱ्या महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) मे.रोलेक्स कंपनीने पुरवठा केलेल्या १० लाख मीटर्सपैकी ४,३०,९०२ मीटर्स सदोष आढळून आले असून त्यामुळे महावितरण कंपनीस एकूण १६०.८०३ कोटीचे नुकसान झाले आहे. मे.फ्लॅश कंपनीकडून १९.२ लाख मीटर्स महावितरण कंपनीने खरेदी केले असून ते तांत्रिकदृष्ट्या योग्य आढळले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) मे. रोलेक्स मीटर्स प्रा.लि., हैदराबाद यांनी पुरवठा केलेल्या सदोष मीटर्समुळे महावितरणला, आर्थिक नुकसान सहन करावे लागले. त्यामुळे सदर कंपनीला दि.२१.३.२०१७ च्या पत्रान्वये काळ्या यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. तर महावितरणाच्या झालेल्या रु.१६०.८०३ कोटी इतक्या रक्कमेच्या नुकसान भरपाई करिता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सदर कंपनीविरोधात दावा दाखल केला असून प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सरावली (ता.डहाणू, जि.पालघर) येथे आदिवासी विकास संकुल उभारण्याबाबत

**(२) * २०६६ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सरावली (ता.डहाणू, जि.पालघर) येथे ८ एकर जमिनीवर आदिवासींच्या कल्याणाकरीता आदिवासी विकास संकुल उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेमध्ये आदिवासी मुला-मुलींकरिता इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा, शासकीय वसतीगृहे, जनतेकरीता सांस्कृतिक भवन व आदिवासी प्रकल्प कार्यालय उभारण्याच्या कामाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) तसेच, सदरहू प्रकल्प पुर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) व (२) हे खरे नाही. आदिवासी विकास संकुल उभारण्याचा प्रस्ताव मौजे सरावली येथे नसून मौजे लोणीपाडा येथे होता. मौजे लोणीपाडा ता. डहाणू येथील गट क्रमांक १०८,१०९,१३६,१३९ व १४० एकूण क्षेत्र १२.३०.०० हे.आर पैकी ३.२०.०० हे.आर (८ एकर) जमीन आदिवासी मुला-मुलींचे ३ वसतिगृह व प्रकल्प कार्यालयासाठी मागणी करण्यात आली होती. तथापि उपवन संरक्षक डहाणू वन विभाग यांनी सदर जमीन देण्यास नकार दिल्याने जमीन अद्याप नावावर झालेली नाही.

(३) जमीन उपलब्ध झाले नसल्याने कार्यवाही करणे शक्य झाले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राळेगांव (जि.यवतमाळ) येथील महिला ग्रामिण सहकारी पत संस्था मर्यादितच्या खातेदारांना रक्कम परत मिळण्याबाबत

**(३) * ५७५०  डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगांव (जि.यवतमाळ) येथील महिला ग्रामीण सहकारी पत संस्था मर्यादित राळेगाव र.न.१२२५ यांनी गरीब खातेदारांच्या ठेवी सहा वर्षाचा कालावधी होऊनही परत केल्या नसल्याने, सबंधीत सर्व खातेदारांनी दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास तहसिल कार्यालय, राळेगाव येथे ठिय्या आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पतसंस्था संचालकांवर कारवाई करून ठेवींची रक्कम परत मिळावी या करिता खातेदारांनी सहायक निबंधक, सहकारी संस्था, राळेगाव यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने पतसंस्था संचालकावर कारवाई करुन खातेदारांची रक्कम व्याजासहित परत करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) होय.

(३) महिला ग्रामिण सहकारी पत संस्था मर्या. राळेगांव या पतसंस्थेच्या ठेवी मिळत नसल्याने संस्थेच्या सभासदांनी संस्थेच्या अध्यक्षा, सर्व संचालिका व व्यवस्थापक यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, राळेगांव येथे एफआयआर क्र.९५/१४ दिनांक १८.०८.२०१४ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान पतसंस्थेच्या सन २०१३-१४ या कालावधीच्या लेखापरिक्षण अहवालात नमूद गंभीर दोषांच्या अनुषंगाने संस्थेच्या लेखापरिक्षकांनी संस्थेच्या संचालक मंडळाने अयोग्य व नियमबाह्य कर्जवाटपावरुन गैरव्यवहार केला असल्याबाबतची तक्रार दि. १५.१२.२०१४ रोजी पोलीस स्टेशन, राळेगांव येथे दाखल केली आहे.

पतसंस्थेच्या सन २०१३ ते २०१४ च्या लेखापरिक्षण अहवालातील शिफारसीनुसार संस्थेच्या संचालिका व अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये चौकशी सुरु आहे. संस्थेच्या ठेवीदारांनी केलेल्या ठिय्या आंदोलनाच्या अनुषंगाने पतसंस्थेची कर्जवसूली व ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी दिनांक १२.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये सहायक निबंधक, सहकारी संस्था, राळेगांव यांचे अध्यक्षतेखाली कृती समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीमध्ये ठेवीदारांच्या प्रतिनिधींचादेखील समावेश करण्यात आला आहे. सदर समितीमार्फत कर्जवसूली कृती आराखडा तयार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाच्या कामकाजात झालेला गैरव्यवहार

**(४) * ४९७४ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील बालकामगारांचे शैक्षणिक पुनर्वसन करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाच्या कामकाजात झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी तत्कालीन मा.कामगार राज्यमंत्री यांनी उक्त गैरव्यवहाराची आयुक्त यांच्यामार्फत चौकशी करण्याचे आदेश दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) चौकशी दरम्यान श्रीमती अपर्णा रमाकांत कांबळे, प्रकल्प संचालक, राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प, सोलापूर ह्या निधी अपव्यय व अनियमितता या कारणाने दोषी आढळुन आल्या असल्याने जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दि.१४.०२.२०२० रोजीचे पत्रान्वये त्यांना कार्यमुक्त केले असुन त्यांचे विरूध्द जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेमार्फत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सारंगवाडी साठवण तलाव (ता.जानेफळ, जि.बुलढाणा) निर्मितीकरिता भुसंपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत

**(५) * ५३०२ श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) सारंगवाडी साठवण तलाव (ता.जानेफळ, जि.बुलढाणा) निर्मितीकरिता सहा वर्षापूर्वी अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनींचे भूसंपादन करण्यात येऊन सात वर्षाचा कालावधी होऊनही शेतक-यांना मोबदला मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांना अद्यापपर्यंत मोबदला न मिळाल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना तातडीने मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) :- सारंगवाडी साठवण तलाव, जि.बुलडाणा या साठवण तलावाच्या तीन भूसंपादन प्रकरणात एकूण ६०.५१ हे. आर. इतकी खाजगी जमीन भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार संपादित करावयाची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. त्यामध्ये मौजे हिवरा खुर्द व मौजे इसोली या २ प्रकरणात कलम ४ ची अधिसूचना दि. ०७/१२/२०१३ रोजी व मोजे किन्ही नाईक या प्रकरणात कलम ४ ची अधिसूचना दि. १८/०७/२०१३

रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. या प्रकरणात दि.०२/०२/२०१५ रोजी ४२ भूधारकांना ८० टक्के अग्रीम मोबदला (एकूण रुपये १.२७ कोटी) वाटप करण्यात आले हाते. परंतु, राज्यामध्ये नवीन भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतानाची भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, दि.०१/०१/२०१४ पासून लागू झाला आहे. त्यामुळे जुना भूसंपादन कायदा, १८९४ नुसार अंतिम निवाडा पारित न झाल्यामुळे नवीन कायद्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. शासनाच्या दि.१२/०५/२०१५ च्या शासन निर्णयानुसार भूसंपादन संस्थेने खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदीची कार्यवाही सुरू केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने निकष बदलून मर्जीतील कंपन्यांना कंत्राट दिल्याबाबत

**(६) * २६३ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडून ६ कंपन्यांसाठी निकष बदलून निविदा शुल्क पाच लाखांवरुन एक लाख रुपये करुन, अनामत रक्कम दहापट कमी म्हणजे एक दशलक्ष टनासाठी तीन कोटी रुपयांवरुन ३० लाख रुपये करावे तसेच कोळसा धुण्याची वार्षिक क्षमता दोन दशलक्ष टनावरुन एक दशलक्ष टन करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने मर्जीतील कंपन्यांना कंत्राट देण्याकरिता बदलण्यात आलेले निकष रद्द करण्याबाबत

तसेच निकषांमध्ये बदल करुन गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) पूर्व लिलाव बैठकित (Pre-Bid Meeting) लिलावात भाग घेऊ ईच्छिणाऱ्या घटकांकडुन प्राप्त शिफारशींच्या आधारे निविदा शुल्क एक लक्ष व अनामत रक्कम एक दशलक्ष टनाकरिता रू.३० लक्ष ठेवण्यात आली होती. सदर बाब निविदा प्रक्रियेत जास्तीत-जास्त सहभाग होऊन स्पर्धात्मकतेला वाव देण्याकरिता महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने घेतला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरखेड (जि.यवतमाळ) येथील वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी वृक्षारोपण योजनेत केलेली अनियमितता

**(७) * ४१४५ श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील प्रादेशिक वन विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी चुरमुरा येथे मिश्र वनीकरण कॅम्पा योजनेत खड्डे न खोदताच वृक्षारोपण करुन शासनाच्या निधीची अफरातफर केल्याप्रकरणी उमरखेडच्या उपविभागीय वन अधिका-यांनी स्वतंत्र चौकशी करुन त्याचा अहवाल पुसद वन विभागाकडे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सादर केलेला असतांनाही यासंदर्भात अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या प्रकरणी संबधित दोषीवर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) यवतमाळ वनवृत्तातील पुसद वनविभागातील स. नं. ०१, चुरमुरा येथे ३५.१५ हे. क्षेत्रावर कॅम्पा योजने अंतर्गत सन २०१८ च्या पावसाळ्यात मिश्र वनीकरणाची कामे हाती घेण्यात आली होती. सदर कामांमध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी, उमरखेड यांचेकडून निष्काळजीपणा झाल्यामुळे त्यांचेविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याची शिफारस उपविभागीय वन अधिकारी, उमरखेड यांनी उपवनसंरक्षक, पुसद यांना केली होती.

उपवनसंरक्षक, पुसद यांनी यासंदर्भात सविस्तर चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी सहायक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा), पुसद यांना निर्देश दिले होते. त्यानुसार सहायक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा), पुसद यांनी दि.०१.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये उपवनसंरक्षक, पुसद यांना अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार रु. १,५६,४८९/- इतक्या शासकीय रकमेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

उपवनसंरक्षक, पुसद यांनी दि.०५.०१.२०१९ रोजीच्या ज्ञापनान्वये वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.)-उमरखेड, संबंधित क्षेत्रसहाय्यक आणि वनरक्षक यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या कलम ०८ नुसार विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू केली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाजार समित्यांच्या आवारात सोयाबीनच्या खरेदीत व्यापाऱ्यांनी घट धरल्याबाबत

**(८) * १७८५ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सततच्या पावसामुळे सोयाबीनचा उत्पादक दर्जा घसरल्याचे आणि दाण्यांमध्ये ओलावा असल्याची कारणे उत्पादकांना देऊन व्यापाऱ्यांकडून प्रति क्विंटल पाच ते सात आणि बारदानाची एक अशी आठ ते नऊ किलो घट धरली जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सोयाबीन उत्पादकांचे नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

राज्यात ३०५ बाजार समित्या कार्यरत आहेत, या बाजार समित्यांच्या आवारामध्ये व्यापाऱ्यांनी सोयाबीनची खरेदी प्रतवारी नुसार केलेली असून, व्यापाऱ्यांनी खरेदीत घट धरल्याबाबत बाजार समित्यांकडे अथवा जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील अनेक कंपन्यांमध्ये कामगार कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(९) * ४५१४ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर असलेल्या उद्योगधंद्यामध्ये परप्रांतीय कामगार काम करीत असून कामगार कायद्याचे उल्लंघन होत असल्याने नागरिकांनी याबाबत अनेक वेळा तक्रारी केल्या असून कंपनीमध्ये घडलेल्या अपघातामध्ये अनेक कामगारांना जीव देखील गमवावा लागला असल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भांडगाव (ता.दौंड, जि.पुणे) येथील मीनाक्षी स्टील या लोखंड बनविणाऱ्या कंपनीमध्ये दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास स्फोट होऊन यामध्ये ३ परप्रांतीय कामगारांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २४ ऑक्टोबर, २०१८ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे कुरकुंभ (ता.दौंड, जि.पुणे) येथील अल्काईल केमिकल लि. व इटरनिस फाईन केमिकल लि. या दोन्ही कंपन्यांमध्ये देखील यापूर्वी स्फोट होऊन काही कामगारांना जीव गमवावा लागल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर तसेच कामगार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या अन्य कंपन्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) दौंड (जि.पुणे) तालुक्यात मोठया प्रमाणावर असलेल्या उद्योगधंद्यामध्ये परप्रांतीय कामगार काम करीत असल्याचे तसेच कामगार कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबतची तक्रार कामगार उपआयुक्त, पुणे यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याची दिसत नाही. तसेच दौंड तालुक्यातील कारखाने अधिनियम १९४८ च्या अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या कारखान्यांमध्ये नोव्हेंबर, डिसेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान कोणताही प्राणघातक अपघात घडलेला नाही.

तथापि, इटरनिस फाईन केमिकल्स लि. व अल्काईल अमाईन्स केमिकल्स लि., एमआयडीसी कुरकुंभ, एमआयडीसी, ता.दौंड, जि.पुणे या दोन कारखान्यांमध्ये अनुक्रमे दि. २०/१०/२०१९ रोजी स्फोटाची व दि.१४/०८/२०१९ रोजी आगीची घटना घडली असून त्यात कोणीही मृत अथवा जखमी झालेला नाही.

मिनाक्षी फेरो इंगॉटस प्रा.लि., ता.दौंड, जि.पुणे या लोखंड वितळुन बार, अँगल इत्यादींचे उत्पादन करणा-या कारखान्यामध्ये दिनांक ३१/०१/२०१८ रोजी वितळलेला धातुचा रस क्रेनच्या सहाय्याने लॅडलमध्ये वाहुन नेत असताना त्यातील धातुचा उष्ण रस बाहेर उडाल्यामुळे ७ कामगारांना भाजण्याच्या जखमा झाल्या. त्यापैकी ३ कामगारांचा हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यु झाला. मृत पावलेले तीनही कामगार हे मुळचे बिहार राज्यातील होते.

इटरनिस फाईन केमिक्लस लि, एमआयडीसी, कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे या कारखान्यात दि.१९/०९/२०१६ रोजी हायड्रोजनेशन विभागातील एका रिॲक्टरचे देखभालीचे काम करताना जादा दाब वाढुन रिॲक्टरचे मॅनहोल उडाले व निर्माण झालेल्या हादऱ्यामुळे रिॲक्टर स्ट्रक्चरसहीत जमिनीवर खाली कोसळले. या अपघातामुळे तेथे काम करणारे २ कामगार रिॲक्टर व शेजारील भिंतीमध्ये दाबले जावून त्यांचा मृत्यू झाला आहे.

अल्काईल अमाईन्स केमिकल्स लि. एमआयडीसी, कुरकुंभ ता.दौंड, जि.पुणे या कारखान्यात दि.१२/११/२०१६ रोजी थर्मिक फ्युईड हिटरच्या बाहेरील भागात थर्मिक फ्युईडला अचानक आग लागल्यामुळे दोन कामगार भाजले. त्यापैकी एका कामगाराचा हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान दि.२४/११/२०१६ रोजी मृत्यु झाला आहे.

(४) वरील दुर्घटनांची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

इटरनिस फाईन केमिक्लस लि, एमआयडीसी, कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे या कारखान्यात दि.१९/०९/२०१६ रोजी झालेल्या प्राणघातक अपघाताच्या चौकशीत आढळून आलेल्या कारखाने अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या भंगाकरिता कारखाने भोगवटादाराविरुध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांचे न्यायालयात २ खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच सदर कारखान्यात दि.२०/१०/२०१९ रोजी झालेल्या स्फोटाच्या चौकशीत आढळून आलेल्या कारखाने अधिनियम,१९४८ च्या भंगाकरिता कारखाना भोगवटादाराविरुध्द एकूण ३ खटले मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

अल्काईल अमाईन्स केमिकल्स लि., एमआयडीसी, कुरकुंभ ता.दौंड, जि.पुणे या कारखान्यात दि.१२/११/२०१६ रोजी लागलेल्या आगीच्या दुर्घटनेच्या चौकशीत कारखाने अधिनियम, १९४८ च्या भंगाकरिता कारखाना भोगवटादाराविरुध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर कारखान्यात दि.१४/०८/२०१९ रोजीच्या आगीच्या चौकशीत आढळून आलेल्या कारखाने अधिनियम,१९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ च्या भंगाकरिता एकूण ३ खटले मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

मिनाक्षी फेरो इंगॉटस प्रा.लि., ता.दौंड, जि.पुणे या कारखान्यात दिनांक ३१/०१/२०१८ रोजी झालेल्या घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पुणे यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. सदर चौकशीत कारखाने अधिनियम, १९४८ मधील तरतूदीच्या भंगाकरिता कारखाना भोगवटादार/ व्यवस्थापकाविरुध्द मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, पुणे यांचे न्यायालयात ३ खटले दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील वीज वितरणासंबंधीच्या तक्रारींबाबत

**(१०) * ५८९९ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) तालुक्यात वीज वितरण समस्या सुरळीत करण्याकरिता महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीने इन्प्र योजनेतंर्गत ग्रामीण व आदिवासी भागातील गाव, वाडी व वस्तीवरील अतिरिक्त दाब असलेल्या ठिकाणी नव्याने रोहित्र बसविणे, कालबाहय झालेल्या वीजवाहिन्या व विजेचे खांब बदलणे आदि विविध दुरुस्त्यांसाठी २५० कोटी रुपयांचे काम दोन वर्षापूर्वी एका खाजगी कंपनीला दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीने संपूर्ण काम दोन वर्षात पूर्ण करण्याची अट असतांनाही कळवण तालुक्यातील बहुतांशी ठिकाणी फक्त रोहित्रांचे सांगाडे उभे असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुक्यात ठेकेदारांकडून सुरु असलेले काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याने दोषी ठेकेदारांवर तसेच कंपनीवर शासन स्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त कामासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यात प्रामुख्याने पायाभूत आराखडा -२ योजनेअंतर्गत प्रस्तावित रु.४२.८९ कोटी इतक्या कामामध्ये ३ नवीन उपकेंद्र, १ उपकेंद्र रोहित्र क्षमतावाढ, २ अतिरिक्त उपकेंद्र रोहित्र, ३२३ रोहित्र, १९० रोहित्र क्षमतावाढ, १४८ कि.मी.उच्चदाब वाहिनी व १८३ कि.मी. लघुदाब वाहिनीचा समावेश असून ती मे. इएमसी लि. जेव्ही श्रीनिवास इलेक्ट्रीकल्स या कंपन्यांना दिनांक ३०.१२.२०१३ रोजी देण्यात आली होती. तसेच दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत इतर कामासमवेत रु.२.९१ कोटी प्रस्तावित करण्यात आली असून त्यात १७ रोहित्रे, ४०.२६ कि.मी. उच्चदाब वाहिनी, ४०.५० कि.मी. लघुदाब वाहिनीचा समावेश असून मे. श्रीनिवास इलेक्ट्रीकल्स जीटीडी प्रा.लि. व मे. एस.टी. इलेक्ट्रीकल्स यांना अनुक्रमे दिनांक २४.४.२०१७ व दिनांक २५.१०.२०१७ रोजीच्या कार्यादेशान्वये देण्यात आले आहे.

(२) व (३) पायाभूत सुविधा-२ योजनेतील कामे संथगतीने होत असल्याने सदर कंत्राटदारांचे काम दिनांक १.६.२०१६ रोजी अंशत: काढून समांतर निविदा काढून ती कामे इतर कंत्राटदारांना देऊन कामे जुलै, २०१८ मध्ये पूर्ण करण्यात आली आहेत. मे. इएमसी ला रु. ६७.७६ लक्ष इतकी रिस्क अॅण्ड कॉस्ट लावली असून रु. १.१६ कोटी इतका दंड लावण्यात आला आहे.

दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गतची कामे प्रगतीपथावर असून ती मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील तत्कालीन प्रकल्प अधिकाऱ्याने केलेला गैरव्यवहार

**(११) * ६५५४ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील आदिवासी जिल्हा अशी ओळख असलेल्या पालघर जिल्ह्याच्या एकात्मिक विकास प्रकल्पा अंतर्गत तत्कालीन प्रकल्प अधिकाऱ्याने ६७ लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याची बाब दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु प्रकरणी डहाणू पोलिस चौकीत अधिकाऱ्यांविरुध्द दाखल झालेल्या तक्रारीमध्ये २००६ ते २००९ अशा चार वर्षात आदिवासींसाठीच्या कन्यादान योजनेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली ५५ लाख रुपयांची रक्कम परस्पर खात्यात वळती केली असून २००८-०९ मध्ये शिवणयंत्रांसाठी २ लाख ८९ हजार रुपये, आदिवासींना ताडपात्री पुरविण्याच्या योजनेत रुपये ३ लाख १८ हजार ४०२ आलेले व २००६-०७ मध्ये आदिवासींसाठी बेन्जो संच साहित्य पुरविणे यासाठी रुपये ५ लाख ७५ हजार २५० हडप केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, त्यानुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१), (२) व (३) सन २००४-२००९ या कालावधीत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये झालेल्या अनियमिततेसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार न्या.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार पालघर जिल्ह्यात, डहाणु प्रकल्पांतर्गतच्या गैरव्यवहारासंदर्भात तत्कालीन संबंधित ११ अधिकारी व ०५ संस्था यांच्याविरुद्ध डहाणु पोलीस ठाणे येथे गुन्हे (FIR) दाखल करण्यात आले आहेत. सदर प्रकरणी पोलीसांमार्फत पुढील तपास करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खामगाव (ता.बार्शी, जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना एफआरपीची व थकीत भाड्याची रक्कम मिळण्याबाबत

**(१२) * ४०४१ श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (ता.बार्शी, जि.सोलापूर) तालुक्यातील आर्यन शुगर लि. या कारखान्याने सन २०१४-१५ या हंगामासाठी शेतकऱ्यांना द्यावयाची ऊस गाळपाची २१ कोटी रुपयांची एफआरपीची रक्कम तसेच २ कोटी ७५ लाख रुपयांचे वाहतूक भाडे थकविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्यन शुगर लि. या कारखान्याची मालमत्ता व लिलाव हा साखर आयुक्त व तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी चुकीच्या पध्दतीने केला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कारखान्याची संरक्षण भिंतीच्या आतील ९७ एकर जमीन असताना फक्त ५ एकर जमीन जप्त केली असून सदर नोटरी बेकायदेशीर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना एफआरपीची व थकीत भाड्याची रक्कम मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे. आर्यन शुगर लि. खामगाव, ता.बार्शी, जि.सोलापूर या कारखान्याकडे हंगाम २०१४-१५ मधील रास्त व किफायतशीर दराची (FRP) रक्कम रु.२११३.५३ लाख थकीत होती. तथापि, दि.१५/०२/२०२० अखेर रु.२१०५.१४ लाख FRP थकीत आहे. सदर कारखाना खाजगी असून या कारखान्याकडून वाहतूकदारांची रक्कम थकविल्याबाबत माहिती प्राप्त झालेली नाही. सदर बाब तृतीय विशेष लेखा परीक्षक वर्ग -१, सहकारी संस्था (साखर) सोलापूर यांनी फिर्याद क्रमांक १५८/२०१७ मध्ये मा. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, बार्शी, जिल्हा सोलापूर न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून पुढील सुनावणी दि. ३.७.२०२० रोजी आहे.

(२) हे खरे नाही. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनूसार आर्यन कारखान्याची मालमत्ता जप्त करुन जाहीर लिलावाद्वारे विक्री करणेसाठी तीन वेळा लिलाव प्रक्रीया राबविली आहे. परंतु, कोणीही वाजवी किंमत इतपत बोली लावलेली नाही. अथवा लिलावात सहभाग घेतलेला नाही. त्यामुळे कारखान्याच्या मालमत्तेचा लिलाव झालेला नाही. साखर आयुक्त कार्यालयाचा या लिलाव प्रक्रियेशी कोणताही संबंध आलेला नाही.

(३) अशंत: खरे आहे. कारखान्याचे नावे असलेली २.४० हेक्टर जमीन जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी जप्त केली आहे. नोटरी बेकायदेशीर असलेबाबत कोणत्याही मा.न्यायालयाचे आदेश प्राप्त नाहीत.

(४) साखर आयुक्तालयाने रास्त व किफायतशीर दराची थकीत रकमेच्या वसुलीकरीता दि.२६/०५/२०१५ रोजी महसुली वसुली प्रमाणपत्र (RRC) आदेश निर्गमित करुन जिल्हाधिकारी, सोलापूर यांना अंमलबजावणीस्तव प्राधिकृत केलेले आहे. जिल्हाधिकारी यांनी कारखान्याच्या मालमत्तेची लिलाव प्रक्रिया राबविली. परंतु वाजवी किंमती इतपत किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेची बोली लावलेली नसल्यामुळे थकीत रास्त व किफायतशीर दराची रक्कमेची वसुली झाली नाही. सबब, कारखान्याच्या विरोधात तृतीय विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (साखर) सोलापूर यांनी मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बार्शी येथे फिर्याद नं.१५८/२०१७ दाखल केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील रोपवनाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१३) * ६३८६ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय वन अधिकारी, अकोला यांनी १२ कोटी रुपयांची रोपवनाची कामे निविदा न मागविता तसेच कामाचे विभाजन करुन सदरहू काम मर्जीतल्या सहकारी मजूर संस्थाना देऊन माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुशिक्षित बेरोजागारांसाठी या संस्था असताना देखील खाजगी ठेकेदारामार्फत कामे करुन घेतल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) असे निदर्शनास आले नाही.

नोव्हेंबर, २०१८ ते ३१ जानेवारी, २०१९ या कालावधीत एकूण २ कोटी ३४ लक्ष इतक्या रकमेची रोपवनाची कामे आवश्यकतेनुसार शासनाच्या विविध शासन निर्णयान्वये विहित केल्याप्रमाणे विविध वनपरिक्षेत्रांकडून स्थळनिहाय मजूर सहकारी संस्थांकडून करवून घेण्यात आलेली आहेत व त्यांना रक्कम अदा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील जनता सहकारी बँक मर्यादित येथील संचालकांनी केलेला गैरव्यवहार

**(१४) * ५३३४ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील जनता सहकारी बँक मर्यादित येथील संचालकांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अंतर्गत चौकशीचा अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना दिनांक १४ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कलम ८३ अंतर्गत चौकशी अहवालावर कलम ८८ अंतर्गत कार्यवाहीचे आदेश देण्यात आले असून, त्यानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय.
(२) जनता सहकारी बँक, अमरावती बाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सहकार आयुक्तांनी अधिनियमाच्या कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, अमरावती यांची नियुक्ती केली. सदर चौकशी अहवालामध्ये बँकेत कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसल्याचे नमुद केले असल्याने अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच सन २०१४-१५ पासून बँकेच्या लेखापरिक्षणात तसेच रिझर्व्ह बँकेच्या अहवालातदेखील कोणतेही दोषारोपण करण्यात आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## टेंबी (ता.औसा, जि.लातूर) येथे सौर ऊर्जा प्रकल्प सुरु करण्याबाबत

**(१५) * ५४०० श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे टेंबी (ता.औसा, जि.लातूर) येथे मंजूर असलेले ६० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आढावा बैठकीत निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्यानुषंगाने सदरील सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम प्राधान्याने करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी उर्जा विभागास दिले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, प्रकल्पाच्या कामास किती निधीची आवश्यकता असून उक्त निधी मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर काम प्रत्यक्षात सुरु करण्याबाबत उर्जा विभागास किती कालावधी लागण्याची शक्यता आहे,
(५) असल्यास, होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) दि.१० जानेवारी, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली लातूर जिल्हयाच्या आढावा बैठकीत मौजे टेंबी येथील सौर ऊर्जा प्रकल्प सुरू करण्याबाबत प्राधान्य देण्याचे निदेश देण्यात आले आहेत.
(२) मौजे टेंबी जवळील मौजे सिंदाला, ता. औसा जि. लातूर येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याकरीता महानिर्मिती कंपनीमार्फत कंत्राटदार निवडण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली असून छाननीअंती कंत्राटदार अंतिम करण्याचे नियोजन आहे.
(३) सदर प्रकल्पासाठी एकूण खर्च रू.२१० कोटी अपेक्षित असून मे. केएफडब्लू बँक, जर्मनी यांच्या अर्थ सहाय्याने प्रकल्प करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रकल्प उभारण्याबाबत कंत्राटदारास इरादा पत्र दिल्यानंतर साधारणपणे १२ ते १४ महिन्यात प्रकल्प उभारणीचे कार्य पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील रिफायनरी प्रकल्प उभारणीबाबत

**(१६) * ४५४० श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील तेल शुद्धीकरण ग्रीन रिफायनरी प्रकल्प उभारणीबाबत तत्कालीन शासनाने सन २०१७ मध्ये निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प उभारणीस तेथील जनतेने प्रखर विरोध केल्यामुळे या प्रकल्पाच्या उभारणीची अधिसूचनाच शासनाने दिनांक ३ फेब्रुवारी, २०१९ रोजी रद्द केली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असतांना सदर प्रकल्प एकीकडे रायगड जिल्हयात स्थलांतरीत करण्याबाबत दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी जाहिर केल्याचे तर दुसरीकडे हाच प्रकल्प पुन्हा रत्नागिरी जिल्हयातील नाणार येथे उभारण्याबाबत पुनर्विचार करण्याचे तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास घोषित केल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्प रायगड वा रत्नागिरी जिल्हयात उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय,हे खरे आहे .
मौजे नाणार (ता.राजापूर) येथील तेल शुध्दीकरण ग्रीन रिफायनरी प्रकल्पासाठी संपादीत क्षेत्राची विनाअधिसूचना दि.०२.०३.२०१९ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.
(३), (४) व (५) सदर प्रकल्प रायगड वा रत्नागिरी जिल्ह्यात उभारणीबाबत शासनापुढे कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

-----------------

## कोल्हापुर जिल्ह्यात गुळाचा दर निश्चित करण्याबाबत

**(१७) * ३५२८ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात गुळ उद्योगावर मंदिचे सावट आले असून गुळ विक्रेत्यांना २८०० ते ३२०० रुपये इतका कमी दर मिळाल्याने गुऱ्हाळघर मालकांना उत्पादन खर्चही मिळत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुळाच्या दरातील चढ-उतारामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड शेतकरी व गुऱ्हाळघर मालकांना सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने गुळाचा दर निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) हे अशंत: खरे आहे.

उत्पादित ऊस पिकांपासून तयार केलेल्या गुळाची विक्री बाजार समिति आवारावर उघड सौद्याने होत असते. कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात माहे डिसेंबर, २०१९ मध्ये विक्रीस आलेल्या कमी प्रतीच्या गुळास प्रती क्विंटल २८०० ते ३२०० असा दर मिळालेला आहे व उच्च प्रतीच्या गुळास प्रती क्विंटल ३५०० ते ५५०० असा दर मिळालेला आहे. माहे डिसेंबर, २०१९ मध्ये गुळास सरासरी प्रति क्विंटल दर रू.३५००/- इतका मिळाला आहे. गुळास कमी दर मिळत असल्याबाबत कोणत्याही गुळ उत्पादक शेतकऱ्यांनी कोल्हापूर कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे लेखी तक्रार केलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साई (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आर्शिया लॉजिस्टिक सर्व्हीसेस लि. कंपनीतील कामगारांच्या विविध मागण्यांबाबत

**(१८) * २७४ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साई (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील आर्शिया लॉजिस्टिक सर्व्हीसेस लिमिटेड कंपनीमध्ये गत १० वर्षापासून कार्यरत प्रकल्पग्रस्त ४०० कामगारांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी काम बंद आंदोलन सुरू केले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीने स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करुन परप्रांतीय कामगारांची भरती करुन काम सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनी व्यवस्थापनाने करार केल्याप्रमाणे कामगारांना न्याय देणे बंधनकारक असतानाही कंपनी व्यवस्थापन पोलीस बळाचा वापर करून आपल्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या प्रकल्पग्रस्त कामगारांवर अन्याय करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त कंपनीतील स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांना न्याय देण्याबाबत तसेच प्रकल्पग्रस्तांवर अन्याय करणाऱ्या कंपनी व्यवस्थापनावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी केली असता आंदोलनादरम्यान व्यवस्थापनाने परप्रांतीय कामगार आणून काम केल्याचे आढळून आले नाही. तथापि, जिल्हा उद्योग कार्यालयाने संबंधित आस्थापनेशी संपर्क साधून माहिती घेतली असता संबंधित घटक लॉजिस्टीक क्षेत्रातील असल्याने पर्यवेक्षीय प्रवर्गासाठी स्थानिक लोकांना विहीत प्रमाणात रोजगार पुरविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास महामंडळाकडून आदिवासी अल्पभूधारक शेतकरी आणि शेतमजुरांना देण्यात येणारे खावटी कर्ज माफ करण्याबाबत

**(१९) * २१७२ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास महामंडळाकडून आदिवासी अल्पभूधारक शेतकरी आणि शेतमजुरांना खावटी कर्जापोटी देण्यात आलेले २४४.६० कोटींचे कर्ज आणि त्यावरील ११६.५७ कोटींचे व्याज असे एकूण ३६१ कोटी १७ लाख रुपयांची रक्कम माफ करण्याचा निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरूप काय आहे व त्याची राज्यात अंमलबजावणी झाली आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाची अंमलबजावणी होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) राज्यातील आदिवासी विकास महामंडळाकडून आदिवासी अल्पभुधारक शेतकरी आणि शेतमजुरांना खावटी कर्जापोटी देण्यात आलेले २४४.६० कोटीचे कर्ज आणि त्यावरील ११६.५७ कोटीचे व्याज असे एकूण ३६१ कोटी १७ लाख रुपयांची रक्कम माफ करण्याचा निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजी मा.मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

(२) व (३) सन २००९-१० ते २०१३-१४ या कालावधीत ११८०२२५ लाभार्थ्यांना रु.२५९.०६ कोटी इतक्या रकमेचे खावटी कर्ज वाटप करण्यात आले होते. त्यापैकी रु.१४.४६ कोटी रकमेची वसुली झाली असून, उर्वरित ११२५९०७ लाभार्थ्यांकडून रु.२४४.६० कोटी इतक्या रकमेची थकबाकी होती. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दुष्काळ सदृश्य परिस्थिती पाणी टंचाई त्यामुळे शेतीमधील कमी उत्पन्न असल्यामुळे कर्जफेडीची क्षमता नव्हती. अल्पभुधारक व शेतमजूर यांना पावसाळयात रोजगार उपलब्ध होत नसल्याने आर्थिक अडचणींमुळे उपासमार होऊ नये यासाठी आदिवासी विकास

महामंडळाने सन २००९ ते २०१४ या कालावधीत आदिवासी लाभार्थ्यांना दिलेले रु.२४४.६० कोटीचे कर्ज व त्यावरील रु.११६.५७ कोटी व्याज अशा एकूण रु.३६१.१७ कोटी इतकी रक्कम माफ करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार, दिनांक ६ जून, २०१९ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यांत आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कौडगाव (जि.उस्मानाबाद) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात तांत्रिक वस्त्रोद्योग औद्योगिक केंद्र उभारण्याबाबत

**(२०) * ४२१७ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हा हा मानव विकास निर्देशांक कमी असलेला निती आयोगाने निवडलेल्या देशातील ११५ जिल्हयांपैकी एक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कौडगाव (जि.उस्मानाबाद) येथे सुशिक्षित बेरोजगार तरुणांना काम मिळावे म्हणून तेथील २५०० एकर पैकी १५०० एकर जमिन अधिग्रहित करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची उभारणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सुशिक्षित बेरोजगार तरुण व तरुणींना रोजगार मिळण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात तांत्रिक वस्त्रोद्योग औद्योगिक केंद्र (technical textiles industrial hub) उभारण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी कौडगाव (जि.उस्मानाबाद) येथे दिनांक ९ जानेवारी, २०२० रोजी प्रकल्प उभारण्याबाबत घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आराखडा तयार करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात तांत्रिक वस्त्रोद्योग औद्योगिक केंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

उस्मानाबाद टप्पा क्र.१ साठी ४२९.१३ हे. आर क्षेत्रापैकी १७३.७४ हे. आर संपादित करण्यात आले असून त्यापैकी ११८.३२ हे आर क्षेत्र मे.महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कं. लि. यांना वाटप करण्यात आले आहे.

कौडगांव टप्पा क्र.३ साठी ४०६.३७ हे. आर पैकी ३७३.३१ हे आर क्षेत्राचा ताबा महामंडळाकडे आलेले आहे. उर्वरित क्षेत्राचे भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सदर बाब धोरणात्मक असून विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागांतर्गत असलेल्या १६५ आश्रमशाळांचे तपासणीअभावी अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२१) * ४३८५ श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागांतर्गत १६५ आश्रमशाळांची तपासणी करण्याबाबचे आदेश शासनाने माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना देऊनही त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे आश्रमशाळांसाठी मिळणारे अनुदान प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "अ" श्रेणी प्राप्त केलेल्या ४० व "ब" श्रेणी प्राप्त ५६ व सन २०१५ मध्ये तपासणीस असहकार दर्शविलेल्या ६९ अशा १६५ आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी दिनांक ८ मार्च २०१९ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनाने आदेश जारी केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू १६५ आश्रमशाळांची तपासणी करुन आश्रमशाळेचे प्रलंबित अनुदान देणेबाबत व पुणे जिल्हयात आश्रमशाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) दि.०९/०१/२०२० रोजी १६५ आश्रमशाळांची तपासणी करण्यात आली आहे.
(२) होय.
(३) याबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नगरधन (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील सूर्यलक्ष्मी कॉटन मिल्स च्या कामगारांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(२२) * ५८७५ ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरधन (ता.रामटेक, जि.नागपूर) येथील सूर्यलक्ष्मी कॉटन मिल्स येथील पॉवर प्लान्ट युनिट बंद करण्यात आला असल्याचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त मिल्स मधील कामगारांना नुकसान भरपाई, माहे ऑक्टोबर, २०१९ चे वेतन, जादा कामाचा मेहनताना तसेच सुट्ट्यांचा बोनस देखील देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामगांराना नुकसान भरपाई पॉवर प्लान्ट युनिट बंद करण्याच्या दिवशी किंवा त्यापुर्वी देण्यात येईल, अशी कामगारांना नोटीस देऊनही नुकसान भरपाई न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कामगारांना नुकसान भरपाई, वेतन इत्यादी अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सूर्यलक्ष्मी कॉटन मिल्स येथील पॉवर प्लान्टमध्ये कार्यरत असलेल्या ६४ कामगारांपैकी ४७ कामगारांनी ऑगस्ट, २०१९ मध्ये राजीनामे दिले होते. व्यवस्थापनाने ऑक्टोबर, २०१९ मध्ये सदरचे राजीनामे मंजूर करून त्यांना कार्यमुक्त केले व त्यांना नियमानुसार सर्व कायदेशीर देणी अदा करण्यात आली आहेत.

उर्वरीत १७ कामगारांनी सदर आस्थापनेचा विद्युत निर्मिती विभाग दि.३१.१०.२०१९ पासून बंद करण्याबाबत व्यवस्थापनाने दिलेल्या दि.३०.०८.२०१९ रोजीच्या नोटीसीला मा.द्वितीय कामगार न्यायालय, नागपूर येथे तक्रार क्र.युएलपी १४८/२०१९ अन्वये आव्हान दिले आहे. यास्तव, उर्वरीत १७ कामगारांना व्यवस्थापनाकडून कायदेशीर देणी अदा करण्यात आलेली नाहीत.

सद्य:स्थितीत सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्हयात अवैधरित्या होत असलेली दारुविक्री

**(२३) * १३०६ श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयात 'दारूबंदी' असतानाही मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या दारु विक्री सुरु असून मागील ११ महिन्यांच्या कालावधीत विविध ठिकाणांहून ९ कोटी रुपयांचा दारुसाठा हस्तगत करण्यात आल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली तसेच अवैध दारु विक्रीस कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) वर्धा जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे माहे फेब्रुवारी २०१९ ते डिसेंबर, २०१९ पर्यंत (११ महिन्याचा कालावधी) एकूण ७८७ गुन्हे नोंदवून ४१४ इतक्या व्यक्तीना अटक केली असून, रुपये २.३४ कोटी इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, पोलिस विभागाने या कालावधीत एकूण ५२१५ गुन्हे नोंदवून, ५५६२ इतक्या व्यक्तींना अटक करुन रुपये ७.२० कोटी इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दोन्ही विभाग मिळून रुपये ९.५४ कोटी इतक्या रकमेचा मुद्देमाल वर नमूद काळात जप्त केला आहे.

(२) व (३) अवैध मद्य व्यवहारातील संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याअंतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले असून, भारतीय दंड संहिता प्रक्रिया १९७३ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती चौकशी/कारवाई करण्यात येत आहे. सदर प्रकरणी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची तजवीज ठेवली आहे.

वर्धा जिल्हयात राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून, सराईत मद्य व्यवसायिकांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ९३ नुसार, सन २०१९-२० मध्ये २७ प्रकरणे संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सादर करुन, त्यापैकी १९ प्रकरणात चांगल्या वर्तणुकीचे बाँड घेतले आहेत.

त्याचप्रमाणे, शासनाच्या धोरणानुसार अवैध दारु धंदयाविरुद्ध करावयाच्या कारवाईत सकारात्मक लोकसहभागासाठी वर्धा जिल्हयातील गावागावात ग्रामरक्षक दल निर्मितीसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येत आहेत.

अशा प्रकारच्या सर्व अवैध मद्य  व्यवहारांविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलीस विभागाकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी औद्योगिक वसाहतीतील कामगारांच्या समस्यांबाबत

**(२४) * ४७८४ श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी औद्योगिक वसाहतीतील प्लॉट क्र ए-३१ वरील स्पेन्टेक्स इंडस्ट्रीज लि. कारखाना बंद करण्याचा निर्णय व्यवस्थापन प्रशासनाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कारखान्यात काम करणाऱ्या १८६९ कामगारांवर बेरोजगारीची वेळ आल्याने व कामगारांना देय असलेली सुमारे रु.२६.०६ कोटी इतकी रक्कम अद्याप मिळाली नसल्यामूळे सदर कामागारांच्या समस्या सोडविण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये कळविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त कामगारांच्या समस्या तातडीने सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया सुरू करून कामगारांचे थकित वेतन अदा करण्याच्या अनुषंगाने अपर कामगार आयुक्त, नागपूर यांचे स्तरावर दि.१८.१०.२०१९, दि.१९.१०.२०१९ व दि.२३.१०.२०१९ रोजी व

जिल्हाधिकारी, नागपूर यांचे स्तरावरुन देखील उभयतांच्या बैठकांचे आयोजन करून तडजोडीसाठी प्रयत्न करण्यात आले. तथापि, कोणतीही तडजोड न झाल्यामुळे तसेच व्यवस्थापनाने कामगारांचे वेतन विहीत वेळेत अदा न केल्याने व्यवस्थापनाविरुध्द वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंतर्गत प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर येथे खटला दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, अपर कामगार आयुक्त, नागपूर यांचेसमोर कामगार प्रतिनिधींनी औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम ३३-C (१) अंतर्गत कामगारांना देय असलेल्या कायदेशीर देण्यांपैकी रु. १६ कोटी रकमेच्या दाखल केलेल्या दाव्यानुसार, वसुली प्रमाणपत्र जारी करण्याची प्रक्रिया अपर कामगार आयुक्त, नागपूर यांचेकडून करण्यात येत असून, भविष्य निर्वाह निधी व कामगार राज्य विमा याबाबत दाखल केलेल्या तक्रारी संबधित कार्यालयांकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

कामगारांच्या थकीत देण्यांबाबत व्यवस्थापनाशी झालेल्या चर्चेदरम्यान, वस्तू व सेवाकर परताव्याअंतर्गत सामुहिक प्रोत्साहन योजनेतील रू. २९ कोटी इतकी रक्कम शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर कामगारांची थकीत देणी देता येतील, असे व्यवस्थापनाने नमूद केले आहे.

सदर कारखान्यास आर्थिक पुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्थांनी कंपनीविरुध्द नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, न्यु दिल्ली यांचेकडे याचिका दाखल केली असून, दि.०३.०१.२०२० रोजीच्या आदेशान्वये ट्रिब्युनलने सदर याचिका दाखल करून घेऊन, इंटरिम रिझोल्युशन प्रोफेशनल यांची नियुक्ती केली आहे. सद्य:स्थितीत सदर कारखाना नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल यांचे ताब्यात असून, कारखान्याचे व्यवस्थापन इंटरिम रिझोल्युशन प्रोफेशनल यांचेकडून पाहिले जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औसा (जि.लातूर) येथील भेलसाठी आरक्षित जमीन पतंजली उद्योग समुहास दिल्याबाबत

**(२५) * १६७३ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) येथील भेल कंपनीसाठी (भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लिमिटेड) आरक्षित करण्यात आलेली ४०० एकर जमीन तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी पंतजली उद्योग समूहाला दिली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भेल प्रकल्पांतर्गत पाच ते सहा हजार स्थानिक तरुणांना रोजगार मिळण्याचे आश्वासन दिल्याने स्थानिकांनी आपल्या जमिनी बाजार भावापेक्षा कमी दराने विकल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भेल ऐवजी पतंजलीचा प्रकल्प येणार असल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली असून, जमिनीही गेल्या व नोकऱ्याही नाहीत अशी स्थानिकांची स्थिती झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पतंजली समुहास दिलेली जमीन भेल कंपनीस देण्याबाबत अथवा स्थानिकांना जमिनीची बाजारभावाने भरपाई देऊन रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

महानिर्मीती मार्फत मौजे सिंदळा लोहारा, ता.औसा येथे खाजगी वाटाघाटीने १३४.५७ हे. आर क्षेत्र ताब्यामध्ये घेतले असून त्यापैकी ११७.४९ हेक्टर जागेमध्ये ६० मे.वॅट सौर प्रकल्प स्थापित करण्याचे प्रस्तावित आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

महानिर्मीती मार्फत शेतकऱ्यांना वाटाघाटीमार्फत दर ठरवून जमीनी खरेदी केल्या आहेत.

(४) सदर जमीन पतंजली उद्योग समूहास देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरीवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतील झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२६) * ९८३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे क्र. २३९/१ हद्दीतील ४,३५९ पात्र झोपडीधारकांनी, प्रती झोपडी ७ हजार रुपये शुल्क वन विभागास, सन २००८ मध्ये वा त्यादरम्यान अदा केले असून सन २०११ च्या जनगणनेच्या यादीमध्ये त्यांच्या नावाची नोंद असतानाही, वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सदरहू झोपडीधारकांच्या झोपड्यांचे बेकायदेशीररित्या निष्कासन करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वन विभागाच्या जागेत एकूण किती झोपडीधारक वास्तव्य करीत आहे, त्यापैकी पात्र व अपात्र असलेल्या एकूण झोपडीधारकांची संख्या माहे जानेवारी, २०२० अखेर पर्यंत किती आहे,

(३) असल्यास, सदरहू पात्र झोपडीधारकांपैकी किती झोपडीधारकांचे पवई, चांदिवली येथे पुनर्वसन करण्यात आले आहे व किती झोपडीधारकांचे पुनर्वसन बाकी आहे,

(४) तसेच, शासनाने अंधेरी पूर्व, मरोळ-मोरोशी येथील १७ एकर जागेत उर्वरित झोपडीधारकांचे एसआरए योजनेतंर्गत पुनर्वसन करण्यासाठी शासन आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून राबविण्यात येणाऱ्या एसआरए प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१), (२) व (३) मालाड, सर्वे क्रमांक २३९/१ मधील सन २००० मध्ये रु.७०००/- भरणा-या ४१०० अतिक्रमकांपैकी ३५६८ पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन संघर्षनगर, चांदिवली येथे करण्यात आले आहे. मालाड, सर्वे क्रमांक २३९/१ मधील सन २००८ मध्ये रु.७०००/- भरणाऱ्या अतिक्रमकांची संख्या ५७३० इतकी आहे. सन २००८ साली रक्कम रु.७०००/- भरणा केलेल्या अतिक्रमकांची पात्रता निश्चिती होणेवर असून त्यांचे पुनर्वसन बाकी आहे. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३०५/१९९५ मध्ये दिलेल्या आदेशानुसार नव्याने होणाऱ्या अतिक्रमणावर तात्काळ कारवाई करुन ते निष्कासीत करण्यात येते.

सन २०१५ मध्ये वन विभागाव्दारे करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात मौजे मालाड, सर्वे क्र. २३९/१ मधील अधिसूचित संरक्षित क्षेत्रात/वनक्षेत्रात ८३०९

अतिक्रमक वास्तव्यास असल्याचे निदर्शनास आले होते. तथापि, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे व अतिक्रमकांचे बायोमेट्रिक सर्व्हेक्षण सध्या प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे व अतिक्रमकांचे पुनर्वसन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाव्दारे करण्याचे संकल्पित आहे. याकरीता मौजे मरोळ-मरोशी सि.टी.एस.नं. १६८९पै, १६९०पै व १६९७पै. मधील वन विभागाच्या ताब्यातील १९० एकर क्षेत्रापैकी ९० एकर क्षेत्र महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर जागेवर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी व अतिक्रमकांसाठी राबवावयाच्या गृहनिर्माण योजनेकरिता म्हाडामार्फत फेब्रुवारी, २०१९ मध्ये ई-निविदा काढण्यात आली. सदर निविदे अंतर्गत २६९५९ सदनिका बांधुन देण्याच्या बदल्यात प्रस्तावित कंत्राटदारास टी.डी.आर देण्यात येणार होता. सदर निविदेस ७ वेळा मुदतवाढ दिल्यानंतर ही सदर ई-निविदेस प्रतिसाद प्राप्त न झाल्याने सदर ई-निविदा ऑगस्ट, २०१९ मध्ये रद्द करण्यात आली.

-----------------

## राज्यातील दोन लाखांवरील कर्ज आणि नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांकरिता निर्णय घेण्याबाबत

**(२७) * ७११ श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.प्रकाश भारसाकळे**

**(अकोट), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंतच्या कर्जमाफीची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी केली असून दोन लाखांवरील कर्ज आणि नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांबाबत निर्णय घेण्यासाठी उपसमिती स्थापन करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोन लाखांवरील कर्ज तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी कर्ज मर्यादा वाढवून मिळावी, त्यांना देण्यात येणाऱ्या कर्जावर व्याज दर कमी करण्यात यावा, या शेतकऱ्यांना कर्जात सुलभता मिळावी व एका अर्जावर शेतकऱ्यांना कर्ज मिळावे याची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) होय.

शेतकऱ्यांना बँकांमार्फत दिल्या जाणाऱ्या पीक कर्जाच्या रक्कमेची मर्यादा संबंधीत शेतकऱ्याच्या पीकाखालील क्षेत्र, त्या क्षेत्रावरील पीकपेरा व संबंधीत पीकासाठी बँकेने निश्चित केलेला पीकनिहाय कर्जदर यावर अवलंबून आहे. सदरचे पीककर्ज सहकार आयुक्त व निबंधक यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समितीमार्फत प्रतीवर्षी निश्चित केले जातात.

शेतकऱ्यांना दिले जाणारे पीककर्ज ६ टक्के व्याज दराने उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाकडून व्यापारी बँकांना १ टक्का दराने व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना २.५ टक्के दराने व्याज परतावा देण्यात येतो. तसेच शेतकऱ्यांनी ६ टक्के दराने घेतलेल्या पीक कर्जाची परतफेड विहीत

मुदतीत केल्यास राज्य शासनाकडून रु. १.०० लाखापर्यंतच्या पीक कर्जास ३ टक्के दराने व्याज सवलत व रु. १ लाख ते ३ लाखापर्यंतच्या पीक कर्जास १ टक्का दराने व्याज सवलत देण्यात येते. राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनाच्या व्याज परतावा व व्याज सवलत अर्थसहाय्यामुळे राज्यातील नियमित कर्जपरतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु. १ लाखापर्यंतचे पीककर्ज बीनव्याजी व रु. १ ते ३ लाखापर्यंतचे पीककर्ज २ टक्के दराने प्राप्त होत आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना सुलभ कर्जपुरवठा होण्यासाठी बँकांमार्फत तसेच क्षेत्रिय कार्यालयामार्फत कर्ज मेळावे आयोजीत केले जातात. तसेच सर्व बँकांना राज्यस्तरीय बँकर्स समिती मार्फत पीककर्जासाठी समान एकसारखा अर्ज उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खारेपाटीतील शहापूर-धेरंड (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील संपादीत जमिनीवर प्रकल्प उभारण्याबाबत

**(२८) * ९०२ श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारेपाटीतील शहापूर-धेरंड (ता.अलिबाग,जि.रायगड) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने टाटा पॉवर कंपनीच्या औष्णिक प्रकल्पासाठी दहा वर्षापूर्वी संपादित केलेल्या १ हजार एकर जमिनीवर अद्याप कोणताच प्रकल्प उभारण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीवर अद्यापि प्रकल्प उभारण्यात आलेला नसतांनाही पुन्हा उपरोक्त परिसरातील सुमारे १ हजार ३०० एकर जमीन संपादन करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ज्या शेतकऱ्यांनी अगोदर जमिनी दिल्या आहेत, त्यांना प्रथम वाढीव दर देण्यात येऊन, उक्त संपादित केलेल्या जमिनीवर प्रकल्प उभारण्याबाबतच्या मागणीकरीता शहापूर-धेरंडमधील काही शेतकऱ्यांसह ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मौजे शहापूर येथील खातेदारांनी जमीनी गावाचा विकास होणेकामी महामंडळास देण्यास तयारी असल्याचे निवेदन दिले तसेच जमिनी औद्योगिक कारणासाठी संपादन करावे याबाबत उपविभागीय अधिकार, अलिबाग याचेकडे स्वाक्षऱ्यांसह निवेदन सादर केले. त्यानुसार मौजे शहापूर, ता.अलिबाग, जि.रायगड येथे खाजगी ७३६.३९४ ह.आर व सरकारी ०.८६८ हे. आर क्षेत्र अधिसुचीत करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ४४ संस्थामधील लिपिक वर्ग प्रशिक्षण केंद्र बंद असल्याबाबत

**(२९) * २१३० श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४४ संस्थामधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर, पुणे (बार्टी) येथील लिपिक वर्ग प्रशिक्षण केंद्र बंद करण्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्थेच्या माध्यमातून करार तत्वावर निविदा काढून हे केंद्र सुरु करण्यात आल्यामुळे प्रशिक्षणामार्फत स्पर्धा परिक्षेस इच्छुक मुलांना शासकीय नोकरीपर्यंत पोहचता येत असून, विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी बहुतांशी माहिती या केंद्रातून मिळत होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत ११ महिन्यांपासून सर्व प्रशिक्षण केंद्रे बंद झाल्याने विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व प्रशिक्षण केंद्र तात्काळ सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) बँक, रेल्वे, एल.आय.सी.लिपीक वर्गीय स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण प्रकल्प नियामक मंडळाची बैठक दि.०५.०४.२०१८ नुसार सन २०१८-१९ मध्ये सुरु करण्यात आला होता. सदर प्रशिक्षण कार्यक्रम ३ बॅचमध्ये ३० जून, २०१९ रोजी संपला आहे. त्यामुळे पुढील प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्याबाबतची प्रक्रिया करण्यासाठी नियामक मंडळाच्या निर्देशानुसार कारवाई सुरु आहे.

-----------------

## शिरूर कासार (जि.बीड) तालुक्यात वसतीगृहातील विद्यार्थ्यांना पोषक आहार पुरविण्याबाबत

**(३०) * ४८१० श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरूर कासार (जि.बीड) तालुक्यातील ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी १२ केंद्रातील ४७ शाळांमधील हंगामी वसतीगृहात दोन हजार विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी प्रत्येक महिन्याकरिता सुमारे ८ कोटी ९८ लाख २२ हजार रुपये इतका खर्च होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतीगृहातील शालेय व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापक यांच्या संगनमताने शाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन पुरविले जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणात तेथील संबंधित विभागाचे अधिकारी व संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांच्या संगनमताने शाळेत निकृष्ट दर्जाचे भोजन देऊन त्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांवर कारवाई करुन वसतीगृहातील विद्यार्थ्यांना पोषक आहार पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

शिरूर कासार तालुक्यामध्ये ४७ हंगामी वसतीगृह सुरू करण्यात आली.

२११४ विद्यार्थ्यांवर खर्चासाठी रू. ६१.६० लक्ष इतकी रक्कम उपलब्ध करून देण्यात आली आहे. निकृष्ट दर्जाचे भोजन दिल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील सागाव औद्योगिक क्षेत्रातील प्रोबेस कंपनीच्या स्फोटामुळे नुकसानग्रस्त झालेल्या मालमत्ता धारकांना भरपाई देण्याबाबत

**(३१) * १४१७ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील सागाव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत प्रोबेस कंपनीत दिनांक १६ मे, २०१८ रोजी स्फोट होऊन

नुकसानग्रस्त झालेल्या मालमत्ता धारकांना ७ कोटी ४५ लाख रुपये नुकसान भरपाई मिळणे अपेक्षित असल्याचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत नुकसानग्रस्त मालमत्ता धारकांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याची बाब दिनांक ६ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त मालमत्ता धारकांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) अंशत: खरे आहे.

डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत प्रोबेस कंपनीत दिनांक २६ मे, २०१६ रोजी झालेल्या स्फोटात २६६० नागरिकांच्या मालमत्तांचे सुमारे रू. ७,४३,२७,९९०/- रूपयांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले असून याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी ठाणे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास सादर केला आहे.

(२), (३) व (४) नैसर्गिक व मानव निर्मित आपत्ती धोरणांतर्गत बाधितांना आर्थिक मदत देण्यासंबंधातील निकषात प्रस्तुत घटना येत नाही. तथापि मानवतावादी दृष्टीकानातून सदर घटनेत मृत झालेल्या १२ व्यक्तींपैकी ९ व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी २ लक्ष प्रमाणे रूपये १८ लक्ष व जखमी व्यक्तींच्या उपचारासाठी रूपये २४,५९,४९०/- इतकी रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून वाटप करण्यात आली आहे.

-----------------

## आदिवासी क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्याबाबत

**(३२) * ४७५३ श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरे, मांडवे, आंबे, मुथाळबे, जांभुळशी, हातवीज (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील आदिवासी पाडे व गावे याठिकाणी स्वातंत्र्यपूर्व काळापासून पिण्याच्या पाण्याची कोणतीही योजना राबविण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासर्व आदिवासी पाडे व गावांसाठी अर्थसंकल्पातील आदिवासींकरिता राखून ठेवण्यात येणाऱ्या ९ टक्के रक्कमेतून त्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना राबविण्यात याव्यात व यापुढे अर्थसंकल्पात आदिवासी क्षेत्रातील गावांसाठी पिण्याच्या पाण्याच्या योजना हे स्वतंत्र हेड (लेखाशीर्ष) तयार करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मा.उर्जा मंत्री यांना निवेदन सादर केले असल्यास, त्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) याबाबतचे कोणतेही निवेदन मा.मंत्री, उर्जा यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले नाही. तथापि, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत (जल जीवन मिशन अंतर्गत) राबविण्यात येणाऱ्या नळ पाणी पुरवठा योजनांकरीता तसेच आदिवासी घटक प्राधान्य असणाऱ्या गाव, वाड्या/वस्त्यांना पिण्याच्या पाण्याकरीता राज्य हिस्सा अर्थसंकल्पित निधी वितरणासाठी या विभागाचे दि.१८.०१.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोरची, (जि.गडचिरोली) तालुक्यातील महाराष्ट्र राज्य् सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या आधारभुत धान खरेदी केंद्राबाबत

**(३३) * ३५३७ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची, (जि.गडचिरोली) तालुक्यातील बेडगाव, कोटरा, कोटगुल, मसेली, बेतकाठी, मरकेकसा येथे राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची आधारभुत धान खरेदी केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आधारभुत धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेल्या हजारो क्विंटल धानाची उचल करण्यात आलेली नसल्याने खरेदी केंद्र बंद पडुन शेतकऱ्यांना आधारभुत धान खरेदी योजनेपासुन वंचीत रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आधारभुत धान खरेदी केंद्रावरील धानाची उचल करुन शेतकऱ्यांकडील शिल्लक धानाची खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१), (२) व (३) गडचिरोली जिल्हांतर्गत कोरची तालुक्यातील कोरची, मसेली, बेतकाठी, मार्केकसा, कोटरा, कोटगुल, रामगड, पुराडा, खेडेगाव, यैंगलखेडा, मालेवाडा व बोरी असे १२ खरेदी केंद्र आदिवासी विकास कार्यकारी संस्थामार्फत व बेडगांव येथे आदिवासी विकास महामंडळाचे १ असे एकूण १३ खरेदी केंद्र दि.१९ नोव्हेंबर, २०१९ पासून सुरु करण्यांत आलेली आहेत.

सदर खरेदी केंद्रावरील गोदामे पुर्णपणे धानाने भरलेले असून धान खरेदी व साठवणुकीकरीता जागा उपलब्ध नसल्यामुळे, दि.१५ जानेवारी ते ३० जानेवारी, २०२० या कालावधीमध्ये सदर केंद्रावरील खरेदी बंद ठेवण्यात आली होती. तद्नंतर, धानाची भरडाईकरीता उचल झाल्याने धान खरेदी पुन्हा पुर्ववत सुरु करण्यांत आलेली आहे.

तसेच आधारभूत धान खरेदी केंद्रावरील धानाची उचल करुन शेतकऱ्यांकडील शिल्लक धानाची खरेदी सुध्दा दि.३१ जानेवारी, २०२० पासून पुर्ववत सुरु करण्यांत आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुदखेड (जि.नांदेड) येथील दुय्यम निबंधक कार्यालयात बनावट चलनाच्या आधारे शासनाची केलेली फसवणूक

**(३४) * २३८१ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदखेड (जि.नांदेड) येथील दुय्यम निबंधक कार्यालयात बनावट चलनाच्या आधारे दस्तावेज तयार करुन शासनाची ९४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.दुय्यम निबंधक, मुदखेड कार्यालयात बनावट चलनाच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याचे दि.०४ जानेवारी, २०२० रोजी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त मुद्रांक जिल्हाधिकारी, नांदेड या क्षेत्रिय कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. उक्त कार्यालयाच्या तपासणीअंती एकूण २४४ दस्तांमध्ये मुद्रांक शुल्क व नोंदणी फी च्या स्वरुपात एकुण रु.१,५८,५६,०१०/- इतक्या शासन महसुलाचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) होय, हे खरे आहे. उक्त प्रकरणी शासनाच्या महसूलाचे नुकसान केल्यामुळे दुय्यम निबंधक, मुदखेड कार्यालयातील सबंधित संगणक चालक (ऑपरेटर) विरुध्द पोलिस स्टेशन, मुदखेड, जि.नांदेड येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, लातूर यांच्या अधिपत्याखालील तपासणी पथकामार्फत दुय्यम निबंधक, मुदखेड या कार्यालयाची तपासणी करण्यात आलेली आहे. उक्त तपासणीमध्ये जवळपास २४४ दस्त रु.१,५८,५६,०१०/- इतक्या महसुलाची हानी झाल्याचे दिसुन आले असल्याने संबंधित संगणक चालक (ऑपरेटर) यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, संबंधित दुय्यम निबंधक/लिपीक यांना निलंबित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारळे (ता.कराड, जि.सातारा) येथील विज वितरण कार्यालयामार्फत पुरविण्यात आलेले वीज मीटर सदोष आल्याबाबत

**(३५) * ५५९३ श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारळे (ता.कराड, जि.सातारा) येथील विज वितरण कार्यालयाअंतर्गत सुमारे साडेसात हजार ग्राहक असून त्यांना पुरविण्यात आलेल्या सदोष विद्युत मीटर मुळे (Faulty meter) वाढीव दराने वीज देयके आकारणी करण्यात येत असल्याबाबत तेथील ग्राहकांनी तारळे वीज वितरण कार्यालय तसेच ओगलेवाडी व उंब्रज येथील विभाग कार्यालयाकडे तक्रारी केल्या असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदोष विद्युत मीटर पुरवठा प्रकरणी संबंधित ठेकेदार तसेच वाढीव दराने होत असलेली वीज देयक आकारणीबाबत संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे. दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी फॉल्टी मीटर व भरमसाठ वीज बिलाविषयी वृत्तपत्रातील बातमी व ग्राहकांकडून ऑनलाईनवर प्राप्त झाली आहेत.

(२) व (३) सदर प्रकरणी महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. तारळे शाखा कार्यालयाकडून वर्षभरात (सन २०१९-२०) एकूण ७९० नादुरुस्त मीटर बदलण्यात आले आहेत. फॉल्टी मिटर असणाऱ्या ग्राहकांची स्थळ तपासणी करुन जे मीटर फॉल्टी नाहीत, परंतु त्यांना फॉल्टी स्टेटसनुसार बिलींग झालेले आहे, असे जानेवारी महिन्यात एकूण २११ व फेब्रुवारी महिन्यात ८० ग्राहकांचे मीटर स्टेटस फॉल्टी ते नॉर्मल करण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने एका मीटर रिडींग एजन्सीला रु.९९००/- चा दंड (माहे एप्रिल ते नोव्हेंबर, २०१९ साठीचा) करुन तो त्यांच्या मीटर रिडींगच्या बिलातून वसूल करण्यात आलेला आहे. तसेच डिसेंबर, २०१९, जानेवारी, २०२० व फेब्रुवारी, २०२० या महिन्यांसाठीचा दंड हा मीटर रिडींग एजन्सीचे बिल प्राप्त झाल्यावर त्यातून वसूल करण्याचे नियोजित आहे. तसेच ग्राहकांना वीज बिल दुरुस्तीसाठी उंब्रज उपविभागीय कार्यालयामध्ये येण्याचा त्रास होऊ नये म्हणून प्रत्येक आठवड्यातील बुधवार व शनिवार तारळे शाखा कार्यालयात उंब्रज येथील बिलींग कर्मचारी यांची वीज बिल दुरुस्तीसाठी गेल्या आठ महिन्यापासून नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माळशिरस (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे वीजपुरवठा नियमित करण्याबाबत

**(३६) * ५६११ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे शेती सिंचनासाठी एकूण ६० वीजरोहित्र आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे यापैकी ३४ वीज रोहित्र सद्य:स्थितीत बंद पडण्याच्या स्थितीत असून उर्वरित रोहित्र दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) सदर तालुक्यात कोणत्याही प्रकारचे भारनियमन नसताना देखील प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे दररोज ५ ते ६ तास वीज पुरवठा खंडीत होत असल्याने सिंचनाकरिता शेतकऱ्यांना गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन वीज रोहित्रांची तातडीने दुरुस्ती करुन वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) व (२) महावितरण कंपनीच्या बारामती ग्रामीण मंडळ कार्यालयांतर्गत सासवड विभागामधील माळशिरस (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे शेती सिंचनासाठी एकूण ५७ वीज रोहित्रे आहेत. त्यापैकी सिंगल फेजचे एकूण २१ रोहित्रे व ३ फेजचे एकूण ३६ रोहित्रे आहेत. वीज व वादळवारा इ. तात्रिक कारणांमुळे थ्री फेजचे एकूण ८ व सिंगल फेजचे एकूण १९ रोहित्रे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत नादुरुस्त झाली होती. नादुरुस्त रोहित्रे वेळोवेळी तातडीने विनाविलंब दुरुस्त करुन बदलण्यात आली आहेत. सद्यस्थितीत सर्व रोहित्रे कार्यरत आहेत.

(३) पुरंदर तालुक्यामध्ये नियमितपणे वीज पुरवठा देण्यात येतो. तथापि, वीज वाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती तसेच रोहित्र नादुरुस्त झाल्यास ते बदली करण्यासाठी वीज पुरवठा तात्पुरता बंद करण्यात येतो.

(४) रोहित्र नादुरुस्त झाल्यास महावितरण कंपनीव्दारे तातडीने बदलण्यात येतात. महावितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा सुरळीतपणे चालू ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक देखभालीकरिता सासवड विभागाकरिता २९ मान्यता प्राप्त कंत्राटदारांची व बिघाड दुरुस्ती देखभालीकरिता १५ मान्यता प्राप्त कंत्राटदारांची ३ वर्षांकरिता नेमणूक करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(३७) * १८० अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भातील अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम तसेच मराठवाड्यातील हिंगोली, परभणी या जिल्ह्यात त्याचप्रमाणे पालघर आणि नाशिक जिल्ह्यात माहे सप्टेंबर ते डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे मका, सोयाबीन, हरभरा, तुर,

कापुस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने सुमारे ३०० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे महसूल खात्याने प्रसिध्द केलेल्या अहवालावरुन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी १०० टक्के फी माफी व्हावी याकरिता शासनस्तरावरून कार्यवाही होण्यासाठी मा.लोकप्रतींनिधींनी आपल्या निवेदनातून मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी शासनामार्फत कोणत्या विशेष योजना राबविण्यात येत आहेत,

(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांबाबत शासनाने ठोस निर्णय घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता असतानाही त्याकडे शासन दुर्लक्ष करित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्याच्या अनुषंगाने तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) होय, हे खरे आहे.

विदर्भातील अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम तसेच मराठवाड्यातील हिंगोली, परभणी या जिल्ह्यात त्याचप्रमाणे नाशिक जिल्ह्यात माहे सप्टेंबर ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत एकूण ३१२ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. त्यापैकी १३४ आत्महत्यांची प्रकरणे पात्र ठरविण्यात आली आहेत. ५४ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आलेली असून १२४ प्रकरणे चौकशीकरिता प्रलंबित आहेत. पालघर जिल्ह्यात एकही आत्महत्येचे प्रकरण निदर्शनास आले नाही.

(२) अंशत: खरे आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुलांना शैक्षणिक मदत/ सवलती मिळण्याच्या अनुषंगाने विविध सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून निवेदनाद्वारे मागणी करण्यात आलेली आहे.

(३) शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१९/प्र.क्र.३४ /म-७, दि.१८ जून, २०१९ अन्वये महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी विविध विभागांनी करण्यासाठी शासनाची मंजूरी देण्यात आली आहे. त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी प्रामुख्याने पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१) शालेय शिक्षण विभाग- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुलांचे शिक्षण, त्यांची फी संबंधी अडचणी सोडविण्यासाठी विशेष धोरणाची आखणी व अंमलबजावणी करणे.

२) महिला व बालविकास विभाग- मुलींचे लग्न जुळल्यास आर्थिक सहाय्य व सामुहिक विवाह पध्दत अवलंबणे.

३) सार्वजनिक आरोग्य विभाग- आरोग्याच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात याकरिता हेल्थ कार्ड देणे.

४) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/महिला व बाल विकास विभाग- आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलीचा संसार तुटलाच तर, तिच्या पालन पोषणाचा प्रश्न महिला बचत गट, रोजगार व स्वयंरोजगार वा अन्य शासकीय योजनेच्या आधारे सोडविण्यास सहाय्य करणे.

५) रोजगार हमी योजना- आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात "मनरेगा" योजना प्राधान्याने राबविणे व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाचा रोहयोच्या कामामध्ये प्राधान्याने विचार करणे.

६) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग- अन्न सुरक्षा योजनेचा लाभ प्राधान्याने देणे.

(४) हे खरे नाही.

(५) शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देण्याच्या अनुषंगाने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र.कृकमा-१२१९/प्र.क्र. १५७/२-स, दिनांक २७ डिसेंबर, २०१९ अन्वये महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ जाहीर करण्यात आली आहे.

नापिकी, राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करू शकल्याने होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा

या तीन कारणांसाठी केलेल्या शेतकरी आत्महत्या प्रकरणी शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ नुसार रू.१.०० लक्ष इतकी मदत देण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरगाव (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथे मठ फिडर अंतर्गत थ्री फेज विद्युत पुरवठा सुरळीत करण्याबाबत

**(३८) * ३९६५ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरगाव (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथे मठ फिडर अंतर्गत येणाऱ्या बोरगाव बु. बोरी, हिवराबळी, चिंचखेडा, चुंगडावाडी, कुठुंबरेवाडी व बोरगाव मठ येथील कृषी पंपासाठी आवश्यक असणारा थ्री फेज विद्युत पुरवठा सुरळीत व्हावा या मागणीसाठी शेतकऱ्यांनी दि. १८ जानेवारी २०२० पासून बोरगाव बु. येथे बेमुदत उपोषण सुरु केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या उपोषणानंतरही वीज वितरण कंपनीने याकडे दुर्लक्ष करून कृषी पंपाचा वीज पुरवठा सुरळीत केला नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, त्यानुषंगाने बोरगाव मठ फिडर अंतर्गत येणाऱ्या गावातील कृषी पंपांना नियमित व सुरळीत वीज पुरवठा मिळण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आह,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. ११ के.व्ही.बोरगांव मठ वाहिनीच्या क्षमतेचा पुर्णपणे वापर करण्यासाठी बोरगांव बु.बोरी, हिवराबळी, चिंचखेडा, चुंगडावाडी, कुठुंबरेवाडी व बोरगांव मठ येथील वीजपुरवठा चक्राकार पध्दतीने नियमित करण्यात आल्याने दिनांक २०.०१.२०२० रोजी सदर शेतकऱ्यांचे उपोषण संपुष्टात आले.

(३) उपकेंद्राची क्षमता वाढविण्याकरिता बोरगांव मठ येथे दुसरा ३.१५ एम.व्ही.ए. क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच ११ के.व्ही. बोरगांव मठ वाहिनीचा भार विभागणी करण्यासाठी लिंकलाईन टाकण्याचे काम प्रगती पथावर असून ते माहे मार्च, २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बरडगाव (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील मंजुर १३२ के.व्ही.सबस्टेशनच्या कामाबाबत

**(३९) * ५७५४ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बरडगाव (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील राळेगाव शहरासह ग्रामीण भागातील उघोग व्यवसाय, जिनींग प्रेसींग, ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना इत्यादींना विज पंप इ. पुर्ण दाबाने वीज पुरवठा होत नसल्याने तीन वर्षापुर्वी उर्जा विभागामार्फत १३२ के.व्ही सबस्टेशन मंजूर करण्यात येवून वीज केंद्राचे काम सुरू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तीन वर्षाचा कालावधी होऊन सुध्दा कंत्राटदाराने काम पुर्ण केले नसल्याने नागरीकांना व उद्योग व्यवसायाला पुर्ण क्षमतेने वीज पुरवठा मिळत नसल्याने दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ येथुन जवळपास ७० कि.मी.अंतरावरुन राळेगाव परिसरामध्ये वीज पुरवठा होत असल्याने पुर्ण दाबाने वीज मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सबस्टेशनचे प्रलंबित काम कधीपर्यत पुर्ण करण्यात येणार आहे व याप्रकरणी शासन स्तरावरुन चौकशी करुन संबधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) महावितरण कंपनीची उपकेंद्राची मागणी व त्यांच्या तांत्रिक प्रस्तावावर राज्य पारेषण उपक्रमाने केलेला प्रणाली अभ्यास (System Study) या आधारे राळेगांव येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याच्या योजनेस महापारेषण कंपनीच्या दि.०२.०३.२०१६ च्या ठरावान्वये मान्यता देण्यात आली आहे. सद्यस्थितीत उपकेंद्राचे स्थापत्य काम ७१.७५ % व अभियांत्रिकी काम ४९.७२ % पूर्ण झाले आहे.

(२), (३) व (४) उक्त उपकेंद्राचे काम विहीत कालावधीत कंत्राटदाराने पूर्ण केले नाही. तथापि दि.१२.०१.२०२० रोजी राळेगांव शहर व ग्रामीण भागास वीज पुरवठा करणाऱ्या १३२ के. व्ही. घाटंजी व २२० के.व्ही. यवतमाळ उपकेंद्रातून योग्य दाबाने वीजपुरवठा सुरु आहे.

राळेगांव येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याचे काम करणाऱ्या कंत्राटदारास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच सदर कंत्राटदाराची रु. १.९५ कोटी एवढी रक्कम रोखून ठेवण्यात आली असून रु. १.४६ कोटीची बॅक हमीपत्र (Bank guarantee) महापारेषण कंपनीकडे जमा आहे. उक्त उपकेंद्राचे उर्वरीत काम करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दौंड (जि.पुणे) येथील मागासवर्गीय मुलांची निवासी शाळा खाजगी जागेत सुरु करण्याबाबत

**(४०) * ४५१९ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) येथे मागासवर्गीय मुलांच्या निवासी शाळेला माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे असूनही उक्त निवासी शाळा जागे अभावी सुरु करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त निवासी शाळेस जागा उपलब्ध करून दिल्यास सन २०१५ - २०१६ या शैक्षणिक वर्षात सुरु करण्याचे आश्वासन मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवासी शाळा खाजगी जागेमध्ये सुरु करण्याची विनंती मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी चा बीसीएस-२०१७/ प्र.क्र.२३८/शिक्षण-२ मंत्रालय, दिनांक २६ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागासवर्गीय मुलांची निवासी शाळा खाजगी जागेमध्ये सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१), (२) व (३) होय.
(४) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना सदर ठिकाणी शासकीय जागेच्या उपलब्धतेबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडून अहवाल प्राप्त करून शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भामध्ये महावितरण कंपनीच्या सदोष विद्युत मीटरमुळे होत असलेले नुकसान

**(४१) * ५३४४ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भामध्ये विद्युत वितरण कंपनीचे नागपूर-१२२६१, चंद्रपूर-९६०२, गडचिरोली-१२३१९, भंडारा-१३५९९, गोंदिया-११२०६, वर्धा-१३१३९, अकोला-१९३३२, बुलडाणा-२८५९७, वाशिम-८७४१, अमरावती-२९७१४ व यवतमाळ-३९२५३ येथे सुमारे २ लाख मीटर सदोष असून संथगतीने फिरत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदोष मीटर बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) तसेच तक्रारीच्या अनुषंगाने किती मीटर बदलण्यात आले आहेत तसेच सदोष व संथगतीने फिरणाऱ्या मीटर रिडींगमुळे महावितरण कंपनीला झालेल्या नुकसानास जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे. महावितरण कंपनीच्या नागपूर परिक्षेत्रात जानेवारी, २०२० मध्ये एकूण २,३४,४५१ ग्राहकांना सदोष मीटर स्थिती (फॉल्टी स्टेटस्) प्रमाणे वीज आकारणी झालेली आहे.

(२) याप्रकरणी महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली असून नागपूर परिक्षेत्रामध्ये माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये संभाव्य मीटर सदोष स्थितीप्रमाणे वाचन झालेल्या मीटर्सची संख्या १,९७,७६३ इतकी होती. त्यापैकी वीज मीटर तपासणी व बदलण्याच्या मोहिमेअंतर्गत एकूण ४१,१४० मीटर सुस्थितीत आढळले व ४३,८१० मीटर बदलण्यात आले असून उर्वरित मीटर तपासण्याचे व बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) महावितरण कंपनीमार्फत नागपूर परिक्षेत्रातील एकूण ४३८१० सदोष मीटर बदलण्यात आले असून सदोष मीटर असलेल्या ग्राहकाला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४ मधील तरतुदीनुसार त्यांच्या सरासरी वीज वापरानुसार वीज देयकाची आकारणी करण्यात येत आहे. नागपूर परिक्षेत्रातील ४३८१० सदोष मीटर्सपैकी ४११६ मीटर्स मे.रोलेक्स कंपनीचे असल्याचे आढळून आले. सदर कंपनीस मार्च, २०१७ पासून महावितरण कंपनीने काळया यादीत टाकलेले आहे. तसेच १४२० मीटर हमी कालावधीमधील असल्याचे आढळून आल्याने ते मीटर संबंधित पुरवठा कंपनीकडून बदलून घेण्याची प्रक्रिया महावितरण कंपनीमार्फत सुरु आहे. सदोष १,९७,७६३ मीटर्सपैकी ४१,१४० इतके मीटर्स हे

सुस्थितीत असल्याचे आढळून आल्याने संबंधित मीटर रिडींग एजन्सीना चुकीच्या मीटर वाचनापोटी रु.२२.६७ लाख इतका दंड करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापुर जिल्हयातील शेतकऱ्यांना प्रलंबित वीज जोडणी त्वरीत देण्याबाबत

**(४२) * ४३५५ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्हयातील शेतकऱ्यांनी शेतीस पाणी पुरवठा करण्यासाठी महावितरण कंपनीकडे वीज जोडणी करीता मागणी करुनही ५४४२ शेतकऱ्यांना अद्याप वीज जोडणी मिळालेली नसल्याची बाब माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापुर जिल्हा हा विज देयकाचा १०० टक्के परतावा करणारा जिल्हा असुनही अदयाप शेतकऱ्यांना वीज जोडणी न मिळाल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना प्रलंबित विज जोडणी त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) व (२) कोल्हापूर जिल्हयामध्ये मार्च, २०१८ अखेर ८४८९ इतके कृषीपंप अर्जदार पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित होते. तसेच एप्रिल, २०१८ ते जानेवारी, २०२० अखेर ४८३७ नवीन कृषीपंप अर्ज महावितरण कंपनीकडे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी सन २०१८-२०१९ मध्ये ४४७१ व एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० अखेर ११६४ अश्या एकूण ५६३५ कृषीपंपाना विविध योजनेतून वीज जोडणी देण्यात आली आहे, तसेच मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेअंतर्गत ३३८ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत.

(३) माहे मार्च, २०१८ पूर्वी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्याकरिता उच्चदाब वितरण प्रणाली योजना राबविण्यात येत असून सदर योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ४३५१ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्याकरिता रु.१०१.१३२ कोटी इतक्या निधीची तरतुद करण्यात आली आहे. सदर निधी अंतर्गत निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन १८ ठेकेदारांना कृषीपंपाच्या वीज जोडणीकरिता कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी माहे फेब्रुवारी, २०२० पर्यंत १४३० कृषीपंपाना वीज जोडणी देण्यात आली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच शेतकऱ्यांना दिवसा सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना जाहीर केली असून टप्याटप्प्याने एक लाख सौर कृषीपंप आस्थापित करण्यात येणार आहेत. सदर योजनेत कोल्हापूर जिल्ह्यातील १३७५ सौर कृषीपंपाचा समावेश असून ७९५ सौर कृषीपंप ग्राहकांनी पैसे भरले असून त्यापैकी ३३८ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य चर्मकार महामंडळाचे कर्ज माफ करण्याबाबत

**(४३) * ४८११ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य चर्मकार महामंडळाचे कर्ज माफ करून बीज भांडवल प्रकरणे निकाली काढावीत, गटई स्टॉलचे वाटप लवकरात लवकर करावे आदी मागण्यांसाठी बीड येथील नागरिकांनी व विविध संघटनांनी दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचेकडून सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून सदर प्रस्ताव शासनाकडे दि. २७.०२.२०२० रोजी प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव संत रोहिदास चर्मोद्‌योग व चर्मकार विकास महामंडळ यांचेकडे पाठविण्यात आला असून, सदर निवेदन तपासून आवश्यकतेनुसार शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**राजेंद्र भागवत**<br>**सचिव (कार्यभार),**<br>**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.